Indian Streams Research Journal
ISSN 2230-7850
Impact Factor : 2.1506(UIF)
Volume-4 | Issue-11 | Dec-2014
Available online at www.lbp.world

महाराष्ट्रातील रेणुका देवी व सप्तश्रृंगी देवीच्या आराधनेतील गोंधळ गीते परंपरा.

डॉ. स्नेहाशीश ज. दास
संगीत विभाग प्रमुख , महिला महाविद्यालय , अमरावती.

सारांश :–

महाराष्ट्र प्रदेश हा देशातील एक महत्वपुर्ण राज्य असून सामाजिक व सांस्कृतीक दृष्टया विविधतेने नटलेल्या महाराष्ट्रात सर्व भाषिक लोक गुण्यागोविंदाने नांदतात. छत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्राचे आद्य दैवत आहे. महाराष्ट्रात पंढरपूर हे एक असे तिर्थक्षेत्र आहे जिथे भाविक संपूर्ण महाराष्ट्रातूनच नव्हे तर पूर्ण देशातून व विदेशातूनही भाविक आषाढी कार्तिकेला मोठ्या संख्येने पांडुरंगाच्या दर्शनाला येतात त्याच प्रमाणे महाराष्ट्रात अनेक देवीचे शक्तीपीठ स्थापित आहेत. महाराष्ट्र ही संताची भूमी आहे. येथे संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजापासून तुकाराम महाराज तसेच आधुनिक काळातील तुकडोजी महाराज व गाडगे महाराजापर्यंत सर्व संतानी आपल्या काव्याव्दारे या दैवतांची खुप आराधना केली तसेच लोक जागृतीचे कार्य मोठ्या प्रमाणात केले. या देवी'–देवतांच्या आराधना पद्धतीमध्येही काव्य व संगीताच्या दृष्टीने वैविध्य दिसून येते. जसे, पांडुरंगाच्या आराधनेत अभंग हा गीत प्रकार गायला जातो. स्वामी समर्थ मेहेरबाबा यांच्या आराधनेत भजन गातात तर देवींच्या आराधनेत गोंधळ गीत प्रकार गायला जातो. रामकृष्ण व इतर देवतांच्या आराधनेत भजन, पद, श्लोक इत्यादींचे गायन केले जाते. प्रस्तुत लेखात महाराष्ट्रातील माहूरची रेणूका देवी व वणीची सप्तश्रृंगी देवीच्या आराधनेत वापरण्यात येणा–या गोंधळ गीतांचा अभ्यास करण्यात येत आहे.

प्रस्तावना :–

गायन वादन आणि नृत्य या तिन्हीचा सुंदर मिलाफ म्हणजे संगीत होय. मानवी आयुष्याचा अविभाज्य घटक म्हणजे संगीत होय. संगीतातील मुलभूत संकल्पना विश्वात भरुन राहिलेल्या आहेत. विश्वातील नाद म्हणजे लय, मानवांतील संभाषणे म्हणजे यातील बंदीशी आहेत यातून मानवी जीवनाचा क्षण–न–क्षण संगीताने व्यापलेला आहे. याची कल्पना येते.

महाराष्ट्र म्हणजे मध्यराष्ट्र, देशाच्या मध्यभागी असलेला हा प्रदेश भारताच्या उत्तर व दक्षिण भागातील सांस्कृतीक चेतनांचा इथे नेहमीच संगम घडत आलेला आहे. संगीताची परंपरा मग ते वन्य जमातीचे असो, लोकसंगीत, शास्त्रीय संगीत असो याचा सुंदर समन्वय महाराष्ट्रात दिसून येतो. महाराष्ट्रातील लोकसंगीत फार समृद्ध आहे. यामध्ये पहाटेची वासुदेव गीते, देवळात होणारे भजन, कीर्तन रंजन व समाज जागृतीकरीता गायली जाणारी भारुडे, वीरगाथा सांगणारे पोवाडे, श्रृंगार रसांनी ओतप्रोत असणारे तमाशे, लावणी इत्यादी गीत प्रकार तसेच जागरण, बालनृत्य, दशावतारी खेळ, ललीत, पिंगळा, बहुरुपी, भुल्या, नंदीबैलवाला, शाहीर, सुंबरान इत्यादी लोकसंगीताने महाराष्ट्राचे संगीत समृद्ध झालेले आहे.

या लोकसंगीताची काही वैशिष्टे पण आहेत जे या ठिकाणी देणे आवश्यक आहे.

1.गीतांचा प्रभाव :– वैशिष्टयपूर्ण गीतप्रकार हे लोकसंगीताचे प्रमुख लक्षण आहे.
2. सामूहिकता :– लोकसंगीत हे सामुहिकरीत्या गायले व सादर केल्या जाते.
3. मौखिक परंपरा :– लिहिण्यावर भर न देता पिढयान पिढया मौखिकतेतून प्रचार व प्रसार हे महत्वपूर्ण वैशिष्टय आहे.
4. संमीश्र प्रेरणा :– करमणूक, प्रबोधन, कलाविष्कार, भक्ती–आराधना इत्यादी लोकसंगीताच्या संमीश्र प्रेरणा आहेत.

महाराष्ट्रात देवीच्या आराधनेला अतिशय जास्त महत्व प्राप्त आहे. देवी सर्व मनोकामना पूर्ण करेल या श्रद्धेतून तिची आराधना मनोभावे केली जाते. यामध्ये प्रामुख्याने माहूरची रेणूका देवी व सप्तश्रृंगी गडावरील सप्तश्रृंगी देवीची आराधना गोंधळी असे म्हणतात. अंगात तेलकट झबला, गळयात देवीची प्रतीमा, कपाळावर कुंकू, गळयात कवडयांची माळ अशी गोंधळयाची वेशभूषा असते. संबळ आणि तुणतुणे या वाद्यांव्दारे नृत्य करुन काकडे पेटवून देवीचे गुणगान करत गोंधळी रात्रभर देवीपुढे गोंधळ घालतो. सर्वशुभ प्रसंगी जसे लग्नकार्य, बाळाची मुंज, नविन वास्तु प्रवेश, अपत्य प्राप्ती व सर्व प्रकारच्या शुभप्रसंगी गोंधळ घालून देवीची आराधना केली जाते.

गोंधळ :–

गोंधळ या शब्दाचा विग्रह केला तर त्यामध्ये गण आणि दल हे शब्द निघतात. गण म्हणजे भक्त आणि दल म्हणजे समुदाय भक्तांचा समुदाय म्हणजे 'गणदल' आणि त्यांनी रुढ केलेला उपासनेचा प्रकार म्हणजे 'गणदल' उपासना त्या गणदलाचे अपभ्रंश रुप गणदल गंदल–गोंदल आणि पुढे गोंधळ हे असे झाले असावे. पुढे शिवाच्या भक्तांनी गणांनी आदिशक्ती पार्वतीची उपासना सुरु केली आणि हया गणदलाच्या उपासना विधितून देवीची उपासना करणारी गोंधळाची परंपरा जन्माला आली.[1]

गोंधळाची सुरुवात गणाने होते. सर्वप्रथम कोणत्याही शुभकार्याची सुरुवात करतांना गणेशाला नमन करण्याची परंपरा गोंधळी पाळतात. त्यानंतर आवतन हा प्रकार असतो. यामध्ये सर्व त्याहत्तीस कोटी देवी–देवतांना गोंधळी गोंधळ ऐकण्याकरीता आमंत्रण देतो. त्यानंतर देवीच्या कथा, स्तुतीस्तोत्र, काही देवतांवर आधारीत लावण्या मनोरंजनात्मक गाणी सादर केली जातात. मग उत्तरांग सुरु होतो. त्यात एखादी कथा लोककथा, पुराणकथा, इतिहासकथा किंवा एखादी सामाजिक कथा सांगितली जाते.

थोडक्यात, गोंधळाचे स्वरुप खालील प्रमाणे असते.
1.गण 2. आवतन 3.गोंधळ विधीनाटयातील कथागीते 4.देवीची गाणी 5.देवदेवता महात्म्यावर आधारित गाणी 6.उपदेशपर गाणी 7. आध्यात्मिक स्वरुपाची गाणी 8.सामाजिक स्वरुपाची गाणी 9. शाहिरी कवनासारख्या रचना.

गोंधळाच्या कार्यक्रमास साधारणतः चार ते पाच माणसे लागतात. गोंधळाच्या प्रमुखाला 'नाईक' म्हणतात. गोंधळाच्या वेळी दिवटी व बुधली ही अत्यावश्यक असते. गोंधळ हे नाव्यात्मकरित्या सादर केल्या जाते. कथानकात येणा-या सर्व पात्रांचे अभिनय संवाद नाईक हा स्वतःच करतो आणि नाईकाला साथीदार म्हणून तुणतुणे वाजविणारा, संबळ वाजविणारा असतात. पौराणिक कथाभागावर जी कथागीते सादर केली जातात त्यात श्रावणबाळ, हरिश्चंद्र तारामती, श्रीयाळ, चांगुणा आणि रेणुका महात्म्य इ.चा समावेश असतो. गोंधळाच्या उगमाबाबत अशी एक कथा सांगितली जाते की, परशुरामाने बकासुराच्या नावाच्या दैत्याचा वध करून त्याचे शिर तोडले. त्या शिराच्या ब्रम्हरंध्रात त्याच्याच शिरांचे तंतू ओवले व ते खांदयावर घेवून तितृण–तितृण असा ध्वनी काढत तो रेणुकेजवळ आला. बकासुराच्या धडाचे चोंडके आणि शिराचे तुणतुणे वाजवून परशुरामाने पहिले मातृवंदन केले व त्यातून गोंधळाची प्रथा उगम पावली.

माहूरच्या रेणूका मातेचा गोंधळ

घरोघरी जागृत स्वरुपात राहून कुळाला आणि कुटूंबाला स्वास्थ व संरक्षण देणा-या रेणूका मातेचे ठिकाण माहूर तीर्थक्षेत्र हे नांदेड जिल्हयातील किनवट तालुक्यातील सिंहाद्री पर्वतावर वसलेले जागृत स्थान आहे. माहूर तथा मातापूर हे क्षेत्र उत्तुंग पर्वतश्रेणींनी वेढलेले असून घनदाट जंगलांनी तेथील सृष्टीसौंदर्य बहरलेले आहे. तीनही बाजुंनी पैनगंगा नदीचा वेढा असल्याने पहाडावरुन भोवतीचे दृश्य अतिशय रमणीय असे दिसते. रेणूका मातेचे मंदीर जुन्या पद्धतीचे असून लहान आहे. आत रेणूकेची पूर्वाभिमुखी अशी भव्य आणि प्रसन्न मुर्ती गळयापर्यंत आहे.[2]

माहूरगडावर रेणूकेचे स्थान कसे स्थिरावले यासंबंधी पुराणातुन विविध प्रकारची माहिती मिळते. भृंगू वंशातील एक तपस्वी ऋषी ऋचीक यांनी गाधीराजाची कन्या सत्यवती हीची पत्नी म्हणून मागणी केली. त्या सत्यवतीचा पुत्र जमदग्नी व त्यांची पत्नी रेणुका होय. हीच ती रेणूका माता होय. जमदग्नी व रेणूका यांच्या विषयी अनेक कथा प्रसि़द्ध आहेत. जमदग्नींचा आश्रम नर्मदा तीरावर होता. तेथेच असलेल्या हाटकेश्वर नावाच्या तीर्थावरुन ते भ्रमण करीत. एकदा कडक उन असल्यामुळे रेणुका दमली व एका झाडाच्या सावलीत विश्रांतीसाठी थांबली. बाण आणण्यात त्यामुळे उशीर झाला म्हणून जमदग्नी रागावले. त्यांनी आपल्या बाणाचा वेध सुर्यावरच धरला. सुर्य त्यांना शरण आला. सूर्याने त्यांना छ़त्र व पादत्राण यांचे दान केले. मीच तुमच्या पोटी येईन असे आश्वासनही त्याने जमदग्नींना दिले. याच वचनास अनुसरुन सुर्य म्हणजे विष्णू–परशुरामाच्या रुपाने रेणूकेच्या पोटी अवतरला.[3]

त्या काळात कार्तवीर्य नावाचा राजा आपल्या लवाजम्यासह जमदग्नीच्या आश्रमात येत. त्यावेळी जमदग्नी यांच्या यथासांग पाहूनचार करीत याचे कार्तवीर्यला नेहमी आश्चर्य वाटे. जेव्हा त्याला आश्रमात 'कामधेनू' गाईविषयी पाहुणचार माहिती मिळाली तेव्हा त्याने जमदग्नींना 'कामधेनू' ची माहिती मागणी केली. कामधेनू वर इंद्राचा अधिकार असल्याने ऋषी देवू शकत नव्हते तेव्हा झटापट होवून जमदग्नी गंभीर झाले व त्यातच त्यांचा मृत्यु झाला. रेणूकेलाही घाव बसले. जेव्हा परशुराम आश्रमात परतला तेव्हा त्याचा क्रोध अनावर झाला. परंतु रेणूकेने त्याला शांत केले व प्रथम ऋषींचा अंत्यसंस्कार करण्यास कोरी भूमी शोधण्याचा सल्ला दिला तेव्हा कवाडीत एका बाजुला जमदग्नींचा देह व एका बाजुला माता रेणुकेला घेवून फिरता फिरता जेव्हा परशुराम सिंहाद्री पर्वतावर असलेल्या कृष्णामालकी तथा माहूर या दत्ते क्षेत्रात आला तेव्हा परशुरामा, ही कोरी भूमी आहे. येथेच अग्निसंस्कार कर अशी आकाशवाणी झाली. अग्नीसंस्कारात रेणूका सती गेली व परशुरामाच्या प्रेमापोटी छातीपर्यंतचा तिचा शरीराचा भाग वर आला अशाप्रकारे अर्ध्या स्वरुपात रेणूका माहूर गडावर स्थिरावली.

अशी ही रेणूकामाता अनेकांना स्फूर्ती देणारी आहे. अनेकांची संकटे दूर करणारी आहे. दुर्गा, चंडिका, अंबिका, काली, लक्ष्मी, सरस्वती, पार्वती, गौरी अश्या अनेक नावांनी शक्तीचे महात्म्य अनेकांनी गायीले आहे.

रेणुका मातेच्या गोंधळ गीतांची सुची थोडक्यात,

1. बोला एकदा सदानंदीचा उदे उदे.....
2. माहूर–मातापूर रेणूका देवीचे पद मातापूर हे उंच पर्वत अवघड घाट.....
3. सत्वर जागृत व्हावे, उठावे, पहा पहाट झाली, कशी जगदंबे, अंबे, रेणुके तुला झोप आली
4. माहुर गड वासिनी आउबाई गोंधळा येई हो
5. मुळपीठ कोरि भूमिका, तेथे नांदे देवी रेणूका
6. रुप सुंदर सुंदर, ध्याती योगी दिगंबर....
7. प्रकट मुळपीठादि भवानी देवी रेणूका सती
8. माहुरगडावरी गडावरी ग तुझा वास भक्त येतील दर्शनास.

सप्तश्रृंगी देवीचा गोंधळ :–

आज महाराष्ट्रातील प्रमुख देवस्थानात वणीच्या सप्तश्रृंगनिवासिनी महिषासुरमर्दिनीचा उदो उदो केला जातो. इतकेच नव्हे तर कोल्हापूर, तुळजापूर व माहूर उर्फ मातापूर येथल्या तीन देवता म्हणजे या सप्तश्रृंगनिवासींच्या प्रतिमाच समजल्या जातात अशी श्रद्धा आहे.

वणी हे गाव नाशिक जिल्हयात आहे आणि सप्तश्रृंगीचा डोंगरही याच जिल्हयात मोडतो नाशिकहून कळवण रस्त्याने नांदुरी हे गाव सुमारे तीस मैलावर लागते व हेच गाव या सप्तश्रृंगी डोंगराच्या पायथ्याशी बसलेले आहे. या डोंगराला सात शिखरे किंवा टोके असल्यामुळे त्याला सप्तश्रृंग असे म्हणतात. हा डोंगर वणी चा डोंगर म्हणूनही ओळखला जातो. वणीच्या या देवीची कहानी अशी की, असुरींच्या छळणुकीने या पृथ्वीवरचे देवलोक अगदी त्रस्त होउन गेले. अक्षरशः गांजले या राक्षसांचे पारिपत्य करण्यासाठी ब्रम्हा, विष्णू व रुद्र यांनी एक महान शक्ती निर्माण केली. या शक्तीने चार ठिकाणी आपले रुप प्रकट केले. त्यापैकी एक ठिकाण म्हणजे हा सप्तश्रृंग पर्वत होय. अन्य ठिकाणे म्हणजे तुळजापूर, कोल्हापूर व माहूर ही होत.

दिंडोरी, कळवण आसमंतातील भागात महिषासूर नावाच्या दैत्याने आणि त्याच्या दोघा भावांनी मिळून देववृत्तीच्या लोकांना अगदी त्रासून सोडले होते. देवीने दोघा दैत्यांना ठार केल्यावर महिषासूराचा वध करण्याकरीता महिषासूर राहत असलेल्या रेडयाच्या शरीराला उडवून लावले. त्याबरोबर महिषासुर रेडयाच्या शरीरातून एवढया शिघ्र गतीने निघाला की, त्या उडाणामुळे डोंगराला खिंडार पडले. देवीने आपली विविध आयुधे महिषासूरावर फेकली.आपल्या सैन्याची झालेली बिकट अवस्था पाहून महिषासुर रेडयावर आरुढ होवून देवीच्या सिंहावर धावून आला. देवीची व त्याची भयंकर लढाई झाली. देवीने महिषासुरावर पाय देवून दाबून धरले. त्याची दोन्ही शिंगे धरुन ठेवली आणि आपल्या हातातील तलवारीने त्याचा शिरच्छेद केला.

अशाप्रकारे महिषासुराचा वध केल्या दिवसापासून आजतागायत देवीने सप्तश्रृंगावर निवास केला आहे. वणीच्या सप्तश्रृंग निवासीनी देवीचे दर्शन घेण्यासाठी चालतांना जेवढे कष्ट अधिक तेवढे पुण्य जास्त पदरी पडते अशी भाविकात श्रद्धा आहे.

गोंधळाची वेळी मांडायची पुजाविधी– 5 उस, 5 कडकणी, खारीक, खोबरं, सुपारी, हळकुंड, बदाम अशा प्रकारची पंचमहाभुतांच्या स्वरुपात 5च्या पटीत हे साहित्य घेवून ते चौरंगावर मांडले जाते. देवीची प्रतिमा चौरंगावर ठेवून त्या प्रतिमेचे पुजन केले जाते. हळद, कुंकू, फुल देवीला वाहिले जाते. विशेषतः नागवेलीच्या पानांची माळ फुलांचा हार देवीला वाहिला जातो. तांदुळाचा किंवा गव्हाचा चौक भरुन त्यावर घटस्थापना केली जाते व आदिशक्ती देवीला आवाहन केले जाते. देवीच्या अलंकारामध्ये कवडयांची माळ आवश्यक असते. गोंधळी पण कवडयांची माळ घालतात. कवडयांची माळ ही गोंधळयाचे देवीशी असणारे नाते अधोरेखित करते.

सप्तश्रृंगी देवीची गोंधळ गितांची सुची थोडक्यात,

1. डोंगर हिरवागार मायातूना डोंगर हिरवागार
2. मायमनी आंबा रो रुपवान, मायम नांदूरी वर्णान ठान....
3. वनी गडाच्या उंच डोंगरी प्रगटली माउली अठराभुजांचे विराटरुप देई आम्हा सावली सप्तश्रृंगी धाव घे...
4. कुंकवाच्या मनासाठी झाल बावरी अन पोत खेळता सप्तश्रृंगी पदर सावरे....

गोंधळ गीतांचे नादतत्व :–

गोंधळगीतांमध्ये नादतत्वाला अतिशय महत्व आहे. गोंधळातून ऐकू येणारा नाद संमत आसमंत भारुन टाकतो. गोंधळात अनेक वाद्यांचा उपयोग केल्या जातो. त्यामध्ये प्रामुख्याने संबळ, तुणतुणे, टाळ, व झांज, दिमडी इत्यादी वाद्यांचा प्रामुख्याने वापर केला जातो. आधुनिक काळामध्ये या वाद्यांमध्ये नवनवीन वाद्यांची भर पडत आहे. आज ढोलकी, ऑर्गन, ऑक्टोपॅड या सारख्या वाद्यांचाही उपयोग होतांना दिसून येतो.[4]

गोंधळाची आशयघनता :–

ज्या प्रमाणे गोंधळ ही आदिशक्ती मायेचा खंडोबाचा असे त्याचप्रमाणे या गोंधळ कलेचा वापर समाजप्रबोधन, समाजजागृती यासाठी सुद्धा केलेला आढळतो. गोंधळ हा लोकसंगीतातील एक प्रकार आहे. गोंधळात प्रचंड जनसमुदायाला प्रेरीत करण्याची, सन्मार्गाला नेण्याची ताकद आहे. भ्रष्टाचार, जातीभेद, राजकारण, लोकसंख्या वाढ असे अनेक प्रश्न सोडविण्याकरीता गोंधळाचा वापर केल्या जाउ शकतो. गोंधळातील हाकेमुळे लोक लवकर एकत्र येतात. गोंधळामध्ये भक्तीभाव समाज जागृती, अध्यात्म, पुराणकथा अश्या सर्व साहित्याचा वापर झालेला दिसून येतो. लोकरंजनाकरीता शाब्दिक कोटया, दृश्य विनोद, श्राव्य विनोद, विनोदी बतावणी, विदुषकी विनोद, इत्यादींचा वापरही केला जातो.

गोंधळगीतात वापरण्यात येणारे सांगीतिकतत्व

गोंधळ हा एक संगीत प्रकार असल्याने त्यातील सांगीतिकतत्वामुळे ही कला अधिक रंजक होण्यास मदत होते. गोधळी हा फारसा शास्त्रीय गायनकला वगैरे जाणत नसला तरीही तो अत्यंत सुरेल आणि उंच पट्टीत गाता येण्याची क्षमता असणारा एक हरहुन्नरी कलाकार असतो. गोंधळगीत गातांना स्वरसमुह राग निवडतांना जनसामान्यांना रुचेल, सर्वांना समाविष्ट करुन घेता येईल, सर्वांना गाता येईल असा सरळसोपा स्वरसमुह घेउन कवन गायल जाते. जास्तीत जास्त लोक सहज गाउ शकतील हा त्यामागचा हेतु असतो. स्वरसमुह निवडतांना भक्तीरसपुर्ण, करुणा भाव असलेला स्वरसमुह गायला जोतो जो लोकांना प्रेरणा स्फुरण देवू शकेल.

गोंधळगीते उंच पट्टटीने साधरणपणे काळी पांढरी 6, काळी 4 या पट्टीत पुरुष गोंधळी गातांना आढळतात. जोगीया, पुरीयाधनाश्री अशा ठेवणीच्या स्वरसमुहाचा वापर होतांना आढळतो. गोंधळगीतामध्ये ताल/ठेका देण्यासाठी सर्व चर्म वाद्यांचा वापर केला जातो. संबळ हे प्रमुख तालवाद्य असते. केहरवा ताल, दादरा ताल या सारख्या 6,8 मात्रांच्या ठेक्याचा प्रभाव अधिक दिसून येतो.

निष्कर्ष :–

अशाप्रकारे महाराष्ट्रातील देवींच्या आराधनेत गोंधळ गीताला अतिशय जास्त महत्व प्राप्त असून हे एक समाज प्रबोधनाचेही तत्व परिपूर्ण भरलेले आहे. ग्रामीण व शहरी भागात आजही गोंधळ हे समाज जागृतीचे कार्य करीत आहे. भक्तीभाव, समाजजागृती बरोबरच याला लोकरंजनाचे वलय ही लाभलेले आहे. गोंधळ या लोकसंगीताला महाराष्ट्राच्या सामाजिक सांस्कृतिक जडणघडणीत महत्वाचे स्थान प्राप्त आहे. आधुनिक लोकरंजनाच्या सिनेमा क्षेत्रालाही गोंधळगीत प्रकारचा वापर होतांना आढळून येतो. त्यामाध्यमातून संपूर्ण समाजात गोधळाचा प्रचार–प्रसार होत आहे. नवनवीन चाली वेगवेगळया वाद्यांच्या उपयोगाने गोंधळगीते अधिक आकर्षित होवून बहुजनांचा कल या कलेकडे आकर्षित होतांना दिसून येतो.

संदर्भ :–

संदर्भ – 1. गोंधळ : परंपरा, स्वरुप आणि अविष्कार पान नं.20
संदर्भ – 2 डॉ.प्र.न. जोशी –माहूरगडवासीनी श्री रेणूका पान नं.594
संदर्भ – 3 डॉ.प्र.न.जोशी– माहूरगडवासीनी श्री रेणूका पान नं. 597
संदर्भ – 4 डॉ.रामचंद्र देखणे–गोंधळ–परंपरा, स्वरुप आणि अविष्कार पानं.107
संदर्भ – 5 गोंधळःपरंपरा, स्वरुप, अविष्कार पान कृ.117